# जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत व डॉ.संतोष शहाणे यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०८ ■ बुधवार दि.१६ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 208 ■ Wednesday Dt.16 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4





# तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी बीड जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याची सुपारी घेतली का?

## गोरगरीब लोकांची लाखो रुपये बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांमुळे वाचत आहेत




## बीड जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याचे षडयंत्र ?

## वार्डमधील सर्व कर्मचारी हे पेशंटला सुखरूप घरी पाठविण्यात यशस्वी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये दररोज असंख्य सिजर, हर्निया, अपेंडिक्स हाडाच्या शस्त्रक्रिया सह अन्य रुग्णांना शस्त्रक्रिया गृहात दिली जाते. सुख सुविधा गोरगरीब लोकांची लाखो रुपये बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांमुळे वाचत आहेत. गोरगरिबांची परिस्थिती नसताना बीड जिल्ह्यामध्ये रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर त्यांची योग्य पद्धतीने सर्व चाचण्या करून त्यांना योग्य पद्धतीने उपचार देत आहेत. बीड जिल्हा रुग्णालयातील बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक संतोष शहाणे, मॅटर रमा ताई गिरी व सर्व विभागातील तज्ञ डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली संबंधित काम होत आहेत. या ठिकाणी विविध वार्डमधील सर्वश्रेष्ठ हे पेशंटला सुखरूप घरी पाठविण्यात यशस्वी होत आहेत. तर काही जणांना असं वाटतं की, आम्ही चांगले होतो म्हणूनच आता बीड जिल्हा रुग्णालय कसं बदनाम करायचं आणि आम्ही चांगले होतो कसे हे दाखवून द्यायचे आहे.

▶ पान २ वर



### जिल्हा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर, सिस्टर, ब्रदर, मामा-मावशी यांचे रुग्णांना मोलाचे सहकार्य!

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये प्रस्तुती दरम्यान, एका महिलेचा रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाल्याच्यानंतर संबंधित महिलेच्या नातेवाईकांनी पैसे दिल्याचा संबंधित डिलिव्हरी कर्मचाऱ्यांवर केलेला आहे. परंतु डॉक्टर, सिस्टर, मावशी यांनी कुठल्याही प्रकारचे पैसे घेतले नाहीत. आणि या ठिकाणी त्यांच्यावरती कारवाईची मागणी केलेली आहे. तर या ठिकाणी नातेवाईकांना तक्रार दिली खरी, परंतु या नातेवाईकांना फोन करणारे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी बीड जिल्हा रुग्णाला बदनाम करण्याची सुपारी घेतलेली आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

- बीड जिल्ह्यातील जनता खंबीरपणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत यांच्या पाठीशी उभा!
- काही पत्रकारांनी जनाची नाही तर मनाची तरी ठेवावी तात्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांचे तळवे चाटणे बंद करा ?
- जिल्हा रुग्णालयात एखादी घटना घडली तर त्याला सर्व डॉक्टर व कर्मचारी जबाबदार नाहीत?
- जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत व सर्व तज्ञ डॉक्टर, सिस्टर, ब्रदर मामा-मावशी यांची टीम जिल्हा रुग्णालय उत्तम सुविधा देण्यास एकच नंबर

### तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांकडून जातीच्या नावाखाली बीड जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याचे षडयंत्र?

बीड जिल्हा रुग्णालयात कोविडच्या कार्यकाळामध्ये भ्रष्टाचाराने बरबटलेल्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यावर कारवाई झाल्यानंतर संबंधित अतिरिक्त जिल्हाशल्यचिकेचा पदभार डॉ. संजय राऊत यांच्याकडे देण्यात आलेला आहे. या खुर्चीची नशा म्हणजे राजकारणाला दुजरा मिळणारी आहे. म्हणून या ठिकाणी डॉ.संजय राऊत हे स्वच्छ प्रतिमेचे व राजकारण मुक्त डॉक्टर आहेत. तर डॉ.संजय राऊत, डॉ.संतोष शहाणे हे एकदम चांगल्या पद्धतीचे काम करून बीड जिल्हा रुग्णालयामध्ये येणाऱ्या जनतेला सुविधा जिल्हा रुग्णालयामध्ये मिळवून देत आहेत. परंतु काही भ्रष्टाचार आणि बरबटलेल्या जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर यांना वाटतं की, आम्हीच चांगले आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न होत आहे.

### बीड जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या गोरगरिबांना चांगल्या सुविधा मिळतातच!

बीडच्या जिल्हा रुग्णालयात जिल्ह्यातील ग्रामीण भागातून येणाऱ्या असंख्य रुग्णांना योग्य पद्धतीने उपचार दिवसरात्र सहकार्य करून, जिथे रक्ताचं नातं शब्दाचं नातं सुरू होतं. अशा पद्धतीचे चांगलं काम बीड जिल्हा रुग्णालयामध्ये चालू आहे. बीड जिल्हा रुग्णालयाच्या एमर्जेंसी विभाग या ठिकाणी संबंधित अपघात झालेले, हृदयविकार, औषध प्राशन, प्रस्तुती डिलिव्हरीसाठी गरोदर माता-भगिनी, साप चावल्यामुळे येणारे रुग्ण, हर्निया, अपेंडिक्स, भगंदर मुळव्याध, भयंकर रोगाने ग्रस्त झालेले लोक रात्री अपरात्री बीड जिल्हा रुग्णालयात दाखल होत आहेत. बीड जिल्हा रुग्णालयातील वेगवेगळ्या विभागांमध्ये तज्ञ डॉक्टर बसलेले असताना या ठिकाणी मात्र रुग्णांना चांगली सुविधा मिळत आहे. परंतु बीड जिल्ह्यातील तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकीय कोरोना काळामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्यामुळे निलंबित झालेले आहेत. आणि तेच आता बीड जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याचे षडयंत्र करत आहेत. मात्र आता बीड जिल्हा शल्यचिकित्सक पदी अतिरिक्त पदभार म्हणून डॉ.संजय राऊत हे एक फिजिशियन असलेले व स्वच्छ प्रतिमेचे डॉक्टर म्हणून त्यांची ओळख आहे. तर बीड जिल्हा रुग्णालयाची अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक व अतिरिक्त पदभार असलेले डॉ.संतोष शहाणे ही स्त्रीरोग तज्ञ आहेत तर यांच्या कार्य काळामध्ये या अगोदर या दोन्ही सीएस आणि आरएमओ डॉ.संजय राऊत, डॉ.संतोष शहाणे यांनी चांगल्या पद्धतीचे काम कोरोना काळात केलेला आहे. गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून बीड जिल्हा रुग्णालयामध्ये व बीड जिल्ह्यामध्ये हे दोन डॉक्टर नामांकित आहेत यांची प्रतिमा स्वच्छ आहे. यांच्या चारित्र्यावर कुठल्याही प्रकारचा डाग नाही पण या ठिकाणी मात्र आता बीड जिल्हा रुग्णालयातील सीएस पदाची खुर्ची ही मात्र राजकीय पुरवड्यांमध्ये उरलेले आहे. तत्कालीन जिल्हा शल्यचिकित यांनी राजकारणाच्या लोकांना हाताशी धरून बीड जिल्हा रुग्णालयामध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केलेला आहे. बीड जिल्हा रुग्णालयातील घोटाळा हा गेल्या चार वर्षांमध्ये अधिवेशनामध्ये अनेकदा मुद्दे घालून त्याठिकाणी जिल्हा शल्यचिकेत सगळ्यांना निलंबित करण्याचे आदेश दोन-तीन वेळा आत राज्याचे तत्कालीन व विद्यमान आरोग्य मंत्री यांनी केलेले आहेत. परंतु बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये काही गलिच्छ असलेले तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक हे बीड जिल्हा रुग्णाला बदनाम करून आम्हीच चांगले होतोत असा दाखवण्याचा एक किराणा प्रयत्न करत आहेत.

### बीड जिल्हा रुग्णालयातून हजारो रुग्ण बरे होऊन गेले, त्याची नोंद मीडिया का घेत नाही

काही मोजके पत्रकार तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या केबिनमध्ये दिवसभर बसून राहायचे. तेच आता बीड जिल्हा रुग्णालयाच्या विरोधामध्ये बातम्या प्रकाशित करत आहेत. परंतु त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात काय चाललं आहे. हे पाहणे गरजेचे आहे. आणि तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संबंधित पत्रकारांना विकत घेतलेले आहे. हे चित्र मात्र स्पष्ट आहे. त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयाच्या विरोधात बदनामी कारक बातम्या छापत आहेत. परंतु बीड जिल्हा रुग्णालयात चांगल्या सुविधा शासन देत आहे. आणि बीड जिल्हा रुग्णालयाचे विद्यमान अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत व अतिरिक्त आर एमो. डॉ. संतोष शहाणे जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी डॉक्टर, सिस्टर, ब्रदर, मामा, मावशी, टेक्निशन हे सर्व योग्य पद्धतीने काम करत आहेत. परंतु त्यांना कुठेतरी गालबोट लावण्याचे काम या पत्रकारांकडून होत आहे. संबंधित पेपरचे पत्रकार हे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांच्या पाय चाटणारे आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता ज्योत रॅली उत्साहात संपन्न

## पोलीस प्रशासन च्या पुढाकाराने द्वितीय वर्षीय समता ज्योत रॅली यशस्वी

**येणाऱ्या प्रत्येक वर्षी देखील हि परंपरा कायम राहील - पोलीस प्रशासन**

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती च्या पूर्वसंध्येला शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी व पोलीस प्रशासन माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य समता रॅली चे आयोजन करण्यात आले होते ही समता रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचली व तेथे ही



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन जुना मोंढा रोड या मार्गाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीम नगर माजलगाव येथे ठीक १२ वाजता बुद्ध वंदनेने रॅलीची सांगता झाली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले माजलगाव शहर पोलिस निरीक्षक मा.राहुल सूर्यतळ, माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी यांनी व तमाम जनसमुदायांनी अभिवादन केले.

या समता ज्योत रॅली मध्ये उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती माजलगाव शहर पोलीस अधीक्षक मा.राहुल सूर्यतळ माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी व सर्व पोलीस प्रशासन तसेच माजलगाव येथील सर्वपक्ष संघटनेचे पदाधिकारी व्यापारी व शिव-शाहू-फुले-आंबेडकरी युवकांची युवतींची व विशेष महिलांची उपस्थिती होती. हि रॅली यशस्वी करण्यासाठी माजलगाव शहरातील शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी यांनी परिश्रम घेतले.

# परळीत पत्ता नसलेल्या माणसाला जन्म प्रमाणपत्र

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

दिनांक १५ रोजी बांगलादेशी बांधवांना व मुस्लिम समाजाला टारगेट केल्याने जे कोणी जन्म नोंदीचे पुरावे व रहिवासी असतील त्यांना रहिवासी प्रमाणपत्र दिलेल्या नायब तहसीलदाराला कुठलाही अधिकार नसताना त्यांनी १२०० होऊन अधिक जन्म नोंदीचे पुरावे दिले आहेत. तहसीलदारावर गुन्हा दाखल होणार असे किरीट सोमय्या यांनी सांगितले आहे. परळी या ठिकाणी भाजपाचे नेते आमदार किरीट सोमय्या यांना मुस्लिम बांधवांनी भर चौकात काळे झेंडे दाखवले आणि त्यांना सगळे आदेश देण्यात आले जन्म व प्रमाणपत्र रद्द करण्यात येत आहे.

जे प्रमाणपत्र दिले आहेत ते खोटे आहेत त्या अधिकाऱ्यांच्या सह्या देखील खोट्या प्रमाणपत्रावर आहेत. ज्या माणसाचा पत्ताच नाही फोटो नाही ओळख नाही आशा ही माणसांना जन्म नोंदीचे प्रमाणपत्र दिले गेले आहे. परळी पोलीस अधिकाऱ्यांना आग्रह केला की त्यांनी गुन्हा दाखल करावा यामागे कोणाचा हात आहे कोण आहे याची पण चौकशी करण्यात यावी अशी मागणी किरीट सोमय्या यांनी केली आहे. बाराशे प्रमाणपत्र जे दिलेत



ते रद्द होणार अधिकार मस्ताना हे प्रमाणपत्र दिलेत नायब तहसीलदार यांची यामध्ये चौकशी झाली पाहिजे.असं लक्षात आले की परळी नगरपालिकेचे अधिकारी हे पण उपस्थित होतेआणि नगरपालिकेचे अधिकारी सुनावणीच्या वेळी परळी नगरपालिकेचा एकही अधिकारी उपस्थित नव्हता मी परळी पोलीस ठाण्याला आग्रह केला आहे की गुन्हा दाखल करावा परळी तहसीलदार स्वतः फिर्यादी होणार आहेत व फिर्याद दाखल करणार आहे. व माझी त्याला हरकत नाही मी स्वतः लक्ष घालणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये चार ठिकाणी मोठा बोगसगिरी प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करणार आहे. असे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले आहे.

पान १ वरून...

# तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी बीड जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याची सुपारी घेतली का?

बीड जिल्हा रुग्णालयात काय चाललं आहे. सीएसआरएम सध्या काय करत आहेत. प्रत्येक वॉर्डमध्ये किती पेशंट आहेत. किती सिरीयस आहेत, ऑपरेशन थेटर मध्ये किती पेशंटची शस्त्रक्रिया झाली, किती पेशंट असते. कोणत्या पेशंटच्या नातेवाईकांनी ऑब्जेक्शन घेतली, कोणत्या सामाजिक कार्यकर्त्यांनी येऊन राडा केला. कोणता डॉक्टर, कोणते सिस्टर, कोणती मावशी मामा कोणता बीड जिल्ह्य रुग्णालयातील कर्मचारी अधिकारी काय? करतो कोण काय बोलतो हे सगळं सांगणाऱ्या काही कर्मचाऱ्यांपैकी महिला कर्मचारी ही आहेत की, त्या तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक यांना फोन करून सर्व माहिती सांगत आहेत. आजही बीड जिल्हा शल्यचिकित्सक हे दोन जण निलंबित झालेले आहेत. तरीपण त्यांना आज तक मध्ये सर्व खबर जिल्हा रुग्णालय मधली देणारे महिला कर्मचारी व पुरुष कर्मचारी हे जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे अगोदर यांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे. त्यामुळे सीएस डॉ.संजय राऊत अतिरिक्त सीएस डॉ संतोष शहाणे यांनी तपासणी गरजेचे आहे. तर एखाद्या पेशंटच्या बाबतीत जर दुर्घटना घडली तर त्या पेशंट व त्याच्या नातेवाईकाला तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक व बीड जिल्हा रुग्णालयातील काही कानात बोलणारे कर्मचारी आहेत की, ते तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मर्जीतील आहेत. ते बीड जिल्हा रुग्णालय बदनाम करण्यासाठी ठरत आहेत कारणीभूत आहेत.

बीड जिल्हा रुग्णालयातील अनेक डॉक्टर, सिस्टर, ब्रदर, मामा-मावशी, सिटीस्कॅन एक्स-रे, सोनोग्राफी, टेक्निशन हे सर्व लोक एक चांगल्या पद्धतीने रुग्णसेवा देत आहेत. परंतु पान पडला तर पिंपळाच झाड पडलं अशी, परिस्थिती दाखवून देणारे व एखादी घटना जर अपघाताने घडली, तर त्या घटनेला हवा देणारे, नालायक स्वरूपाचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी बीड जिल्हा रुग्णाला बदनाम करण्याचे षडयंत्र केलेले आहे. हे आता जनतेच्या लक्षात आले असल्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयामधील प्रत्येक वार्डमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने चांगल्या रुग्णांना सेवा देऊन चांगलं बरं करून त्यांना घरी पाठवण्याची जिम्मेदारी बीड जिल्हा रुग्णालयातील सिस्टर, ब्रदर, डॉक्टर, मामा-मावशी सर्व टेक्निशियन व बीड जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी चांगलं काम करत आहेत. त्यांच्या पाठीशी दैनिक महाराष्ट्र आरंभ व बीड जिल्ह्यातील जनता खंबीरपणे उभा राहणार आहे. तर सीएस डॉ संजय राऊत अतिरिक्त सीएस डॉ संतोष शहाणे हे चांगल्या प्रकारचे अधिकारी आहेत. बीड जिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना जनतेने सहकार्य करण्याची भावना ठेवणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्यांकडून बोलले जात आहे. तर या ठिकाणी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून अनेक कर्मचाऱ्यांना त्रास होईल, अशा पद्धतीचे राजकारण करून या ठिकाणी बीडच्या जिल्हा रुग्णालयाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे.

# बीड आगारात मा. फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## संविधान पुस्तक वाटप करून अनोख्या पद्धतीने केली जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड आगारात महामानव क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती बीड आगारात विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या उत्सव समितीच्या वतीने सर्व प्रमुख पाहुणे एस.टी. महामंडळातील अधिकारी कर्मचारी यांना भारताचे संविधान यांच्या प्रति वाटून एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवराज कराड, विभागीय वाहतूक अधिकारी, आगाराचे आगर प्रमुख श्री डोके साहेब, चंद्रकांत आप्पा नवले, माजी शिवसेनाप्रमुख सेवानिवृत्ती झालेले कर्मचारीवर्ग पर्यवेक्षक श्री भोले साहेब, विभागीय वाहतूक निरीक्षक गणेश जगताप, वाहतूक निरीक्षक भीमकिरण बनसोडे, वाहतूक निरीक्षक ज्योती नागरगोजे वाहतूक नियंत्रक मामा




गायकवाड, वाहतूक नियंत्रक सुभाष कोकाटे, वाहतूक कास्ट्राईब संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुरेश ससाने, सचिव मोहम्मद, रियाज सहाय्यक निरीक्षक, शिशिर कुमार वाघमारे, अतुल कुलकर्णी, सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक बबन वडमारे, गणेश चव्हाण, संतोष जाधव सहाय्यक वाहतूक निरीक्षक, सेवाशक्तीचे गोरे, विनोदी शेख, या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत भारताचे संविधान सर्व कर्मचाऱ्यांना व उपस्थित प्रमुख पाहुण्यांना भारताचे संविधान वाटप करण्यात आले. या उत्सवासाठी विभागीय कार्यालय बीड आगार बीड आगार कार्यशाळा या ठिकाणी कर्तव्य असणारे सर्व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. या सर्व कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाचे वाटप बीड विभागाच्या विभाग नियंत्रक सौ अनुजा दुसाने शिवराज कराड आगार प्रमुख डोके सर यांच्या हस्ते वाटप करून एक स्तुत्य उपक्रम क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश मस्के, बाबा डोळस, वंदना पंडित, दयानंद गायकवाड, महादेव गायकवाड, प्रदीप वडमारे नितीन पवार, चंद्रकांत वडमारे, नितीन रसाळ, संदीप वाघमारे, महादेव वडमारे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल कांबळे व दीक्षा कोरडे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश ससाने यांनी करून हा स्तुत्य भारतीय संविधान वाटप करण्याचे कारण या ठिकाणी सर्व कर्मचाऱ्यांना माहिती दिली. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले भारतीय संविधान हे घराघरात पोहोचले पाहिजे व त्याचा अभ्यास सर्व कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचावा हा या उपक्रमाच्या माध्यमातून संदेश देण्याचे काम या उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले शेवटी आभार प्रदर्शन प्रताप शिंदे यांनी केले. या जयंती उत्सवात एसटी चे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोंडराईत फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न



## या रक्तदान शिबिरामध्ये ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले

गेवराई । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान करून महामानवाला अभिवादन करूयात असा संकल्प करत दि. १४ एप्रिल रोजी सकाळी धोंडराई येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिर आयोजक- सार्वजनिक भीम जयंती उत्सव धोंडराई व लोकनियुक्त सरपंच शितलताई साखरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ज्या मानवाने आपले संपूर्ण आयुष्य मानव कल्याणासाठी खर्ची केले त्या महामानवाच्या कार्यापासूनच प्रेरणा घेऊन अनेक संकटातून बाहेर जात आहोतच व. रक्तांचा तुटवडा पडत असताना धोंडराईतील समाज बांधवांनी एकत्रित येऊन रक्तदान करून खऱ्या अर्थाने मानव कल्याणाचे काम करून या दोन्ही महामानवांना अभिवादन केले. दिवसभर सुरू असलेल्या या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या कार्याला फुले -आंबेडकर प्रेमी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



बीड - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सारनाथ कॉलनी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी फहीम इनामदार, पोलिस बॉईज असोसिएशनचे अध्यक्ष रविंद्र शिनगारे उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जन्मोत्सव फ्रेंड्स क्लब, फ्लावर्स क्वार्टर येथे मोठ्या उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जीवनात जे काही मिळाले आहे ते केवळ आणि केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच असे प्रतिपादन बाबासाहेब पोटभरे यांनी केले. तर डॉ. विवेक घोबाळे यांनी संबोधन करताना म्हणाले की बुद्ध विहार केवळ डोकं किंवा मस्त टेकवण्याच्या पलीकडे आपला विचार असावा. म्हणजेच ज्याच्या घरात पुस्तकाचं नाही कपाट त्याचं घर होईल सपाट असं म्हणत त्यांनी शारीरिक सुदृढता आणण्यासाठी दररोज व्यायाम केला जातो अगदी त्याचप्रमाणे बौद्धिक समृद्धता मिळवायची असेल तर बौद्धिक कसरत करणे आवश्यक आहे दररोज बुद्ध विहारात एक तास पुस्तक वाचन उपक्रम राबवावा पुढे बोलताना म्हणाली की पुस्तक माणसाला घडवतात आणि ते माणसं जग बदलण्यास सुरुवात करतात म्हणून आपल्या मुलांना चांगल्या वातावरणात ठेवणे हे आई-वडिलांचे व समाजातील









नागरिकांचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर पुस्तक देखील माणसावर संस्कार करतात म्हणून आपण देखील भारतीय संविधानाचे संस्कार हे आपल्या मुलांवर केले पाहिजे. कारण आजचा तरुण उद्याचा राष्ट्राचा पाया आहे. जातीय भेद, धर्म भेद, रंग भेद, स्त्री-पुरुष भेद अशा अनेक विकृत मानसिकता नष्ट झाल्या पाहिजेत आणि सर्वांना समान संधी समता बंधुता आणि न्याय या मूल्यांची जोपासना करणे हे नैतिक जबाबदारीचे काम आहे. मुलांवर असे प्रतिपादक केले. तसेच घोबाळे परिवाराच्यावतीने कालकतीत घनःशाम एकनाथ घोबाळे यांच्या स्मरणार्थ १५० ग्रंथ व एक पुस्तक रॅक देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रायटिंग अँड स्पीचेस खंड, महात्मा जोतीराव फुले समग्र वाङ्मय, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे समग्र साहित्य खंड, राजर्षी शाहू महाराज, सिद्धार्थ गौतम बुद्ध, रमाई आंबेडकर, सावित्रीबाई फुले, राजमाता अहिल्याबाई होळकर, वामनदादा कर्डक, नामदेव ढसाळ, आ.हा. साळुंखे, यशवंत मनोहर, ज.वी. पवार, ड.प्रकाश आंबेडकर, वामन मेश्राम इत्यादी नामवंत साहित्यिकारांची व इतर धर्मातील समाज सुधारकांची जीवन चरित्र व योग अभ्यास, पाककृती, लहान मुलांसाठी प्रेरणादायी गोष्टी, सुविचार असे एकंदरीत ग्रंथालय देण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम क्रांतीचे प्रतिक निळा ध्वज व त्यावर अशोक चक्र असणाऱ्या ध्वजाचे ध्वजारोहण पो.कॉ. बाबासाहेब पोटभरे यांच्या हस्ते तर डॉ. विवेक घनःशाम घोबाळे यांच्या हस्ते तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून धूप, दीप प्रज्वलित करून सामूहिक बुद्ध वंदना घेऊन विनम्र अभिवादन करण्यात आले.या जयंतीचे अध्यक्ष पृथ्वीराज बाळकृष्ण साबळे हे होते. विचार मंचावर कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून पो. कॉ. बाबासाहेब पोटभरे व प्राचार्य डॉ. विवेक घनःशाम घोबाळे हे होते. यांना शॉल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. तर या जयंतीनिमित्त लहान मुला-मुलींचे लेझीम संघ, प्रबोधनपर भीमगीत वर नृत्य, गायन, रांगोळी स्पर्धा आदींचे आयोजन केले व मान्यवरांच्या व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते लहान मुलांना प्रोत्साहन पर पुष्पगुच्छ व एक ट्रॉफी बक्षीस म्हणून देण्यात आली. आणि कार्यक्रमाची सांगता सरन्त्य घेऊन खीर वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक आयु. संजय टिपरे व फ्रेंड्स क्लब यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फ्रेंड्स क्लब चे सर्व युवा सदस्य व ज्येष्ठ मार्गदर्शक यांनी पथक प्रयत्न केले. या प्रसंगी फ्लावर्स क्वार्टर येथील सर्व जाती-धर्मांचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद उल्हासात जयंती साजरी करण्यात आली.

# शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडे होरपळून जाताहेत

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडलाय : डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश । प्रतिनिधी
दरवर्षी रब्बी हंगामातील ज्वारीचे, गव्हाचे पिक निघाल्यानंतर शेतीची मशागत सुरू होते. यादरम्यान शेतकरी आपल्या शेतात खत टाकणे, नांगरणी करणे आदी कामे करतात. यादरम्यान ज्वारी, गव्हाचा खोडवा नष्ट करण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या ताली पेटवुन देतात. रस्त्यालगत असणाऱ्या शेतजमीन मालकांकडून लावलेल्या आगीत झाडे होरपळून निघतात. झाडांची मोठी हानी होते. झाडे लावा, झाडे जगवापाणी अडवा पाणी जिरवा अशा आपण दिलेल्या घोषणा हवेतच विरतात. त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते याचा विचार केला जात नाही. ग्रामीण भागातील शेतकरी पिकांना वसवा नको म्हणून बांधावरील झाडे तोडतात.
उष्णतेचा दाह वाढल्याने हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडांना ईजा होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी केले आहे.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडला आहे**

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या वृक्षसंपदेचे, वनसंपदेचे महत्व पटवुन देणाऱ्या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आपल्याला विसर पडला असुन तो अंगिकारला तरच पुढील पिढ्या सुखाने आनंदाने जगतील. माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. पुर्वी रस्त्याच्या बाजूला वडाची, पिंपळाची, लिंबाची मोठमोठाली झाडं असायची. त्यामुळे रस्त्याने जाताना थंडावा जाणवायचा. मात्र आता रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली अनेक मोठमोठाल्या वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. तोडण्यात आलेली झाडे पुन्हा लावण्यात येत नाहीत.

# आ. धनंजय मुंडे यांनी केली वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांची पाहणी

## मंदिर व परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्त्व जपून दर्जेदार पद्धतीने वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना



परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी
बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून मंजूर असलेल्या २८६ कोटी रुपयांतून सुरू असलेल्या विविध कामांची माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांच्या तसेच कंत्राटदारांच्या समवेत पाहणी केली.
मंदिर परिसरात भव्यदर्शन मंडपाचे काम सुरू असून आता चौथ्या मजल्याचेही काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी ग्लास री-इन-फोर्सड कॉंक्रीट पद्धतीने काम पूर्ण करावे, दगडी पायऱ्यांचे काम तसेच परिसरातील अन्य वस्तूंच्या कामाच्या संदर्भात पुरातन महत्व जपून तसेच दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण केले जावे अशा सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांना केल्या आहेत.
वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी २८६.६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून यातून आतापर्यंत एका भव्य अशा भक्त निवासाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. प्रदक्षिणामार्गाचे काम देखील अंतिम टप्प्यात असून, भव्य असे प्रवेशद्वार दगडी पायऱ्या दर्शन मंडप अशी कामे सध्या सुरू आहेत.
मंदिर परिसरातील वास्तूंचे पुरातन महत्व जपण्याबरोबरच दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत काम पूर्ण करावेत अशा सूचना धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधितांना केल्या. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, राजा खान, जाफर खान, आर्किटेक्ट श्री बांगड, शिल्पकार गनीभाई यांसह अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युवकांनी दिले भोजनदान

## परिसरातुन त्या युवकाचे कौतुक



तलवाडा । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्ष मोठ्या थाटामाटात भीम महोत्सव चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये चार ते पाच दिवस भिम महोत्सव चालणार असून त्यातील पहिला कार्यक्रम १४ एप्रिल रोजी अभिवादन सभा मान्यवरांच्या हस्ते घेण्यात आली होती. या सभेसाठी बाहेरून येणाऱ्या तसेच गावातील गावकऱ्यांसाठी हातावर पोट असणारे युवकांनी भर उन्हात थंड पाण्याचे जार तसेच पुलाव खिचडी स्वतःच्या पैशाने आयोजन केले होते. त्या युवकाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून कार्यक्रमाच्या शेवटच्या क्षणापर्यंत पाणी तसेच जेवणाची सोय केली होती.
याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तलवाडा येथे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यातील पहिला कार्यक्रम हा १४ एप्रिल रोजी घेण्यात आला होता.
अभिवादन सभा घेण्यात आली होती यामध्ये तालुक्यातील सर्वच राजकीय नेते तसेच माझे आमदार अमरसिंह पंडित साहेब, नूतन आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थिती अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे तलवाडा व परिसरातील सर्व अनुयायी तसेच सर्व समाज बांधव बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जुन्या बस स्टँड या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरच पूर्ण कृती पुतळा असून या ठिकाणी सर्व समाज बांधव येतात त्यामुळे मोठी सभा घेण्यात आली.
येथील भीमसैनिक संदीप मधुकर डोंगरे, विजय सजीवन डोंगरे, रोहन माणिक डोंगरे, गोविंद दिलीप करडे, रतन राजू डोंगरे, प्रतिक दिलीप भोले, सुमेध राजू आठवले, करण विष्णू डोंगरे, यांनी उन्हाची दाहकता लक्षात घेत अभिवादन करण्यासाठी येणारे सर्वांसाठी स्वतः खर्च करून थंड पाण्याचे जार, व खिचडी पुलाव सर्वांना वाटप करून शेवटच्या अनुयायापर्यंत वाटप केले असून त्या ठिकाणी कुणालाही उपाशीपोटी जाऊ दिले नसून या तरुणांच्या परिसरात कौतुक होत आहे.

# श्रीमती राधिका घोलप यांना राज्यस्तरीय योगारत्न पुरस्कार जाहीर



बीड । प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड चे श्रीमती राधिका घोलप यांना राज्यस्तरीय योगारत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
सर्वत्र त्यांचे कौतुक होतं आहे. या सर्व त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दाखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाना श्रीमती राधिका घोलप यांना योगा व आहार सेवा करत त्या हनोई, व्हिएतनाम, येथे आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत योगाच्या दोन स्पर्धांमध्ये दोन गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल श्रीमती राधिका घोलप, योग प्रशिक्षक, प्रा. आ. केंद्र चऱ्हाटा, यांचा सत्कार करताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ सर सोबत डॉ पी के पिंगळे, जिल्हा आयुष अधिकारी, श्रीमती अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, श्री संतोष चक्रे, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्री संदीपान मांडवे, विस्तार अधिकारी आरोग्य हे उपस्थित यांनी सत्कार केला आहे. या त्यांच्या योगा विषय प्रचार प्रसार नेहमी करत असून येणाऱ्या काळात महाराष्ट्र राज्यात योगाचा प्रसार आणि प्रचार करणार आहेत. या त्यांच्या कार्याचा आदर्श महिलांना घेता यावा म्हणून त्यांना योगारत्न पुरस्कार ने सन्मानित करण्यात येणार आहे.
या राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार सोहळ्यास राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.
या कार्यक्रमासाठी महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब,राष्ट्र संत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आयएएस / आयपीएस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. आदर्श प्रशासकीय सेवा राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्काराचे पत्र देताना सं. अ. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य चे बीबी वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी आदी दिसत आहेत. श्रीमती राधिका घोलप यांना राज्यस्तरीय योगारत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होतं आहे.



धारूर वनपरिक्षेत्र येथे नुकतेच रुजू झालेले तरुण व विकसनशील वनपरिक्षेत्र अधिकारी श्री ईश्वर गुणवंत साहेब यांचा सत्कार करुन शुभेच्छा देताना सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के, वामन पाईक, रमेश पाईक व ईतर.

# बीड तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीची संघटनात्मक आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी
महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या



आदेशानुसार ब्लॉक कांग्रेस संघटनात्मक आढावा व नवीन कार्यकारिणी निवडी संदर्भात बीड तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीची बैठक पक्षनिरीक्षक मा. अमरजी खानापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि.१५ एप्रिल २०२५ मंगळवार रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे पार पडली. यावेळी पक्षनिरीक्षक अमर खानापुरे यांचा बीड तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.
या बैठकीस उपस्थित सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचे म्हणणे पक्षनिरीक्षक यांनी जाणून घेतले व सर्वांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या सर्वांच्या भावना प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या समोर मांडून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहू. या बैठकीस नवनाथ थोटे, गणेश बजगुडे पाटील, दादासाहेब मुंडे, फरीद देशमुख, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, शेख मोहसीन, रमेश सानप, शेख रियाज, गणेश जावकर, सिराज पटेल, रामधन जमाले, अमोल पाठक, कादर बाबा इनामदार, हनुमान घोडके, कल्याण टेकाळे, विष्णु मस्के, नवसे पाटील, रमेश पाटील, अविनाश डरपे, विद्याताई गायकवाड, शेख अर्शद, शामसुंदर जाधव, गणेश करादे, शेख शफीक, अमजद कुरेशी, शेख जाहीर, सफदार देशमुख, खमरोद्दीन सय्यद कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज येथे आझाद क्रांती सेनेची तालुकास्तरीय बैठक




केज । प्रतिनिधी
केज येथील शासकीय विश्रामगृहामध्ये १५/०४/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजता राजेशजी घोडे यांच्या भक्कम नेतृत्वात बैठक संपन्न झाली. यावेळी विचार मांडत असताना आझाद क्रांती सेनेची निर्मिती कशा पद्धतीने झाली याची सविस्तर माहिती राजेशजी घोडे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिली. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत तरी अर्थिक आणि सामजिक स्वातंत्र्य समाजात प्रस्थापित झालेले नाही. सामजिक विषमतेची दरी दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आपल्या अनेक पिढ्या मनुवादी व्यवस्थेमुळे बरबाद झालेल्या असल्यामुळे मनुवादी व्यवस्था मुळापासून उपटून टाकण्यासाठी आझाद क्रांती सेनेचा जन्म झाला आहे. असे यावेळी बोलताना राजेश घोडे म्हणाले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची खरी चळवळ आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातुन पुढे चालवली जात आहे. या सेनेचे कार्यकर्ते देश विदेशात देखिल आहेत. भारत हा तरुण देश आहे. हा जर तरुणांचा देश आहे तर मग आझाद क्रांती सेना सुद्धा तारुण्यात आहे आणि याच ताकतीने भविष्यात ही सेना काम करेल असे आश्वासन सेनाप्रमुख राजेश घोडे यांनी दिले. आपल्या अनेक पिढ्या मनुवादी गुलामित खाक झाल्या असुन त्यावेळी झालेले अन्याय अत्याचार आपल्याला विसरता येणार नाहीत. आक्रमक भूमिका घेऊन अपल्याला या व्यवस्थेच्या विरोधात ताकतीने लढावं लागेल याची देखिल आठवण यावेळी त्यांनी करून दिली. प्राध्यापक सिद्धार्थ शिनगारे यावेळी आवर्जून उपस्थीत होते.
नेता कसा असला पाहिजे, त्याची कार्यकारणी कशी असली पाहिजे याची सविस्तर माहिती देत असताना स्व. एकनाथरावजी आव्हाड यांच्यानंतर त्यांचे काम खऱ्या अर्थाने जर कोणी पुढे नेत असेल तर ते रमेशजी घोडे आहेत. एकनाथ आव्हाडांची हुबेहुब छवी राजेशजी मध्ये दिसून येत असल्याचे यावेळी बोलतांना ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी बहुसंख्य कार्यकर्त्यांनी हजेरी लावलेली होती. गायरान जमिनी संदर्भात अनेकांनी आपल्या समस्या व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचान सामजिक कार्यकर्ते बाबूराव गालफाडे सर यांनी केले. आभार प्रदर्शन तुकाराम शिंदे यांनी व्यक्त केले. तसेच व्यवस्थापन शरद थोरात यांचेकडे होते. महादेव आव्हाड, महादेव अडागळे, किसन भिसे, विनायक लोंढे, बळीराम मरके, अशोक ढगे, अरुण आव्हाड, बाळू आव्हाड, संतोष जोगदंड, दत्तात्रय झाडे, सय्याजी ढवळे, अर्जुन शिंदे, बालाजी गोंडे, अर्जुन शिंदे, जालिंदर कसबे, पांडूरंग कसबे, राजू लांडगे, दिलीप गालफाडे, परशुराम मोरे यावेळी आवर्जून उपस्थीत होते.

# डॉ.आंबेडकर जयंती निमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अभिवादन : गायकवाड

गेवराई । प्रतिनिधी
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य नेते डॉ. बाबासाहेब



आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले या दोन्हीही महापुरुषांची जयंतीचे औचित्य साधून दोन्हीही महापुरुषांची जयंती निमित्त गेवराई शहरात उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. या जयंती सोहळ्याला शहरातील व ग्रामीण भागातील महिला पुरुष, युवक, बालक व सर्व समाज घटकातील बंधू-भगिनी बहुसंख्याने उपस्थित होते व मोठ्या उत्साही वातावरणात थाटामाटात जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे निमित्ताने यावर्षीचे आकर्षण म्हणून बाबासाहेब आंबेडकरांची सात फुटाची संविधानासह प्रतिकृती व बाबासाहेबांची प्रतिमा ही सर्व गेवराईकरांचे डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली. या निमित्ताने महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड मराठवाडा न्यूज चॅनलचे संपादक शेख जावेद सर, दैनिक वास्तव चे शहर प्रतिनिधी शेख खाजाभाई, पत्रकार इमरान सौदागर, जफर राज टेलर, गेवराई तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण उमाप इत्यादी पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दोन्हीही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.

# गायरानाच्या मुद्द्यावर अधिकारी गप्प का?

■ जवळगावच्या गायरान धारकांचा प्रशासनावर रोष, आत्महत्येचा प्रयत्न आणि उपोषणातून संतप्त प्रतिक्रिया
■ तोंडी आदेश आम्हाला मान्य नाही, लिखित आदेश द्या
■ केवळ वेळकाढूपणा आणि गरीबांचं जमिन हडपण्याचा कट आहे काय?

अंबाजोगाई | प्रतिनिधी

सध्या अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथे गायरान वाद चिघळलेला असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. जवळगाव गायरान जमिनीवर सुरु असलेल्या सोलर प्रकल्पाच्या कामाला विरोध करणारे गायरान धारक दोन दिवसांपूर्वी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयात गेले होते. या वेळी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे आणि अजिंक्य भैय्या चांदणे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी साहेबांनी बैठक घेऊन स्पष्ट आश्वासन दिले की, सोलर प्रकल्प गायरान धारकांच्या जमिनीवर न होता, दुसऱ्या गायरान जागेवर हलवण्यात येईल.

मात्र, या निर्णयावर कोणतीही कारवाई झाली नसून, प्रत्यक्षात सोलर प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. आज १५ एप्रिल रोजी गायरान धारकांनी अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी दीपक वाजले यांच्याशी चर्चा केली. या वेळी त्यांनी तहसीलदारांना फोनवरून कारवाईचे आदेश दिले असले तरीही प्रत्यक्षात कोणतीही लिखित अधिसूचना देण्यात आलेली नाही.

तोंडी आदेश आम्हाला मान्य नाही, लिखित आदेश द्या अशी भूमिका सोलर



कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांनी घेतली आहे. भरारी न्यूजशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, आम्ही कोणत्याही तोंडी आदेशावर काम थांबवणार नाही. या पार्श्वभूमीवर गायरान धारकांनी गंभीर आरोप केले असून, अधिकारी आणि सोलर कंपनी यांच्यात संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला आहे. गायरानवर सुरू असलेल्या कामामुळे काही धारकांमध्ये नैराश्य निर्माण झाले असून, तीन धारकांनी विषारी औषध सेवन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

याचवेळी गायरानवर उपोषण करणाऱ्या पुरुष आणि महिलांना बर्दापूर पोलिसांनी जबरदस्तीने ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. काही वेळानंतर त्यांना सोडण्यात आले. ग्रामपंचायत देखील गायरान धारकांच्या बाजूने असून, संपूर्ण

> गंगा माऊली सोलर प्राइवेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजर व विजय तुकाराम माचवे गिलल चे अधिकारी याच्या सोबत कधीही बोलणे झाले नाहित तरीही यांनी जवळगाव गायारण धारक यांच्या वर खोटे गुन्हे दाखल केले आहेत.

> मौजे जवळगाव तालुका आंबेजोगाई जिल्हा बीड गावरान गट नंबर २११ गायरानधारकांची यादी १४ जणांचे नावे आहेत त्यांचे जातीचे नाव आहेत.

गावामध्ये चर्चा सुरू आहे की, जर लेखी आदेश दिलेच जात नसतील, तर हे सगळं केवळ वेळकाढूपणा आणि गरीबांचं जमिन हडपण्याचा कट आहे काय? प्रशासनाने दिलेले आश्वासन प्रत्यक्षात उतरत नसल्याने, गावकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. आता सर्वांचे लक्ष जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या प्रत्यक्ष कृतीकडे लागले आहे.

## गेवराई शहरातील अचानक नगर येथील काही नागरिकांचे बेकायदेशीर नळ कनेक्शन?

### बेकायदेशीर नळ कनेक्शन असल्याने इतर नागरिकांना करावा लागतो पाणीटंचाईचा सामना

बीड | प्रतिनिधी

गेवराई शहरातील अचानक नगर येथील काही लोकांनी बेकायदेशीरपणे पाणीपुरवठा करणाऱ्या नगरपरिषदेच्या नळ पाईप लाईन ला नळ कनेक्शन काढल्याने, काही नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. ज्यांच्या नावे नळ कनेक्शन आहे त्यांनी स्वतःच्या हाताने रोड खोदून दुसरा नळ कनेक्शन घेतल्यामुळे नळ धारकांना पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागत आहे. तसेच ज्यांनी बेकायदेशीर नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्यांच्याकडून आतापर्यंतची पाणीपट्टी वसूल करावी अशी देखील मागणी होत आहे. असे बेकायदेशीर नळ कनेक्शन घेतलेल्यांना नगरपरिषदेने धडा शिकवावा. तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक च्या नागरिकांनी केली आहे. तर काही लोकांनी नगरपरिषद कडून पुन्हा कनेक्शन न घेता बेकायदेशीरपणे स्वतः कनेक्शन घेतले आहे व नगरपरिषदेला विश्वासात न घेता कसलीही माहिती न देता परस्पर नळ कनेक्शन घेतली आहे



त्यामुळे इतर नळ कनेक्शन धारकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी साहेबांनी तातडीने नळ कनेक्शन चा सर्वे करून ज्यांनी बेकादेशीर कनेक्शन घेतले आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.



## मंदिरासमोरील मटण विक्री बंद करा : जागर प्रतिष्ठान आक्रमक

बीड | प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सिमरी पारगाव येथे हनुमानाच्या मंदिरासमोर मटन विक्री केले जाते त्यामुळे मंदिराच्या पावित्र्यास बाधा निर्माण होत आहे लवकरात लवकर गावातील विनापरवाना दारू आणि मटण विक्री बंद करा अशा मागणीचे निवेदन आज जागर प्रतिष्ठानच्या वतीने तहसील कार्यालय माजलगाव येथे देण्यात आले. गावात सुरू असलेल्या विनापरवाना दारू विक्री मुळे अनेक संसार उद्धवस्त झाले आहेत. लवकरात कारवाही न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला तसेच यावेळी जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, प्रकाश काळे सर, ज्ञानेश्वर गायकवाड सर, सत्यम कोरडे, गोरख चव्हाण, संतोष मुंडे दिनेश कोरडे, रंगनाथ सागर, रामेश्वर पदुळे, अनिकेत कोरडे, ओमकार कराळे, हनुमान कोरडे, ज्ञानेश्वर मोरे, जनक पडुळे, आदित्य कोरडे, राहूल भराटे आदी शिलेदार उपस्थित होते.

## ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी आंदोलनाशिवाय पर्याय नाही : युसूफ, गंगाधरे

बीड | प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवरची गेल्या दोन महिन्यात तीनच कामे झाली आहेत. उर्वरित अकरा कामांची अजूनही प्रतीक्षाच असल्याने उर्वरित कामांसाठी आता आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.



शहराची ऐतिहासिक ओळख असलेल्या कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करावे म्हणून दिलेल्या निवेदनाला १४ एप्रिल २०२५ रोजी पूर्ण २ महिने झाले आहे. या २ महिन्यात तिथे १० सिमेंटचे बाकडे ठेवण्यात आले तर हौदात पाण्याच्या मोटारी बसवून पाण्याचे फवारे सुरू करण्यात आले तसेच फवाऱ्यांसाठी रंगबिरंगी लाइट्स चालू करण्यात आल्या. वास्तविक पाहता कारंजा टॉवरचे नूतनीकरण परिपूर्ण करण्यासाठी १४ कामांची आवश्यकता आहे. त्यापैकी गेल्या २ महिन्यात फक्त तीनच कामे करण्यात आली असून अजूनही ११ कामांची पूर्तता करणे बाकी आहे. मात्र यासाठी बीड नगरपालिकेची आंतरिक इच्छा असल्याचे गेल्या २ महिन्यातही दिसून आले नाही. कारण दोन महिन्यांच्या लांबलचक कालावधीत फक्त ३ कामे होणे म्हणजे काम करण्याची ही गती कासवगती पेक्षाही कमी असल्याचे दिसत आहे. काम करण्याची गती जर अशीच राहिली तर कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली उर्वरित ११ कामे पूर्ण होण्याकरिता अजून खूप वर्ष वाट पहावी लागेल. खरे तर कारंजा टॉवरच्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी आवश्यक असलेल्या कामांची यादी जिल्हा प्रशासनासह बीड नगरपालिका प्रशासन, पोलीस अधीक्षक आणि तहसीलदार यांना सुद्धा दिलेली आहे. यामुळे नेमकी कोणती कामे करायची याकरिता प्रशासनाला कोणतीही अडचण येणार नाही. निवेदनाच्या माध्यमातून दिलेली यादी त्यांच्यासमोर आहे. तरीसुद्धा त्या यादीनुसार अजूनही कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी पाऊल उचलले जात नसल्याने आता कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.



## राजेवाडी येथील बौध्दविहाराच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवा

### सरपंच व ग्रामसेवकाकडे ग्रामस्थांची निवेदनाद्वारे मागणी

माजलगाव | प्रतिनिधी

तालुक्यातील राजेवाडी येथील भीमनगर बौद्धविहाराच्या नियोजीत जागेवर नारायण सोनपसारे यांनी अतिक्रमण करून ताबा घेतला असल्याने ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे न्यायासाठी धाव घेतली आहे.

राजेवाडी येथील नारायण संभाजी सोनपसारे यांनी गावातील भीमनगर भागातील बौद्धविहाराची नियोजित जागा हडप करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण करून घेतली आहे. ग्रामस्थांनी वारंवार तोंडी सूचना दिल्या विनंती केली परंतु नारायण सोनपसारे हे कुनाचंही ऐकायला तयार नसल्याने शेवटी ग्रामस्थांच्या वतीने आर पी आय नेते गंगाधर सोनपसारे बहुजन विकास मोर्चा चे नेते अभिजीत पोटभरे व ग्रामस्थ महादेव सोनपसारे यांनी राजेवाडी येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे धाव घेतली असुन लवकरात लवकर अतिक्रमण हटवुन बौद्धविहाराची जागा ताब्यात घेऊन समाज बांधवांच्या ताब्यात द्यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल अशा अशयाची निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

## घरकुलाचा हप्ता न मिळाल्यामुळे पाऊण तास दोन कर्मचाऱ्यांना कोंडले

### नागरिकांसाठी विविध योजना शासन आणतो पण अधिकारी-कर्मचारी करतात नागरिकांची पिळवणूक

धारूर | प्रतिनिधी

प्रधानमंत्री घरकुल योजनेचा हप्ता न मिळाल्याने लाभार्थ्यांनी संतप्त होत धारूर पंचायत समितीत जावुन घरकुल विभागाच्या अधिकाऱ्यासह महिला कर्मचाऱ्यांना पाऊन तास कोंडले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कार्यालयात बसुन असतानाही मला माहित नसल्याचे सांगत हात झटकले. गटविकास अधिकारी दालनातून बाहेर आल्यानंतर घरकुल विभागाला लावलेले कुलूप उघडून कर्मचाऱ्यांना बाहेर काढले.प्रधानमंत्री घरकुल योजनेत धारूर तालुक्यात ५ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली होती. या योजनेतील घरकुलांचा पहिला हप्ता हा शासनाने २२ फेब्रुवारी रोजी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या संबंधित विभागाला सूचना होत्या परंतु २२ फेब्रुवारी ३ हजार ७०० लाभार्थ्यांनाच हप्ता जमा करण्यात आला होता. उर्वरित लाभार्थी पहिला हप्ता मिळण्यासाठी पंचायत समितीच्या घरकुल विभागाला मागील दीड महिन्यापासून खेटे मारत होते. यानंतर उर्वरित ५०० लाभार्थ्यांचा हप्ता ३१ मार्चपर्यंत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला होता.

प्रधानमंत्री घरकुल योजनेत धारूर तालुक्यात ५ हजार घरकुलांना मंजुरी



मिळाली होती. या योजनेतील घरकुलांचा पहिला हप्ता हा शासनाने २२ फेब्रुवारी रोजी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या संबंधित विभागाला सूचना होत्या. परंतु २२ फेब्रुवारी ३ हजार ७०० लाभार्थ्यांनाच हप्ता जमा करण्यात आला होता. उर्वरित लाभार्थी पहिला हप्ता मिळण्यासाठी पंचायत समितीच्या घरकुल विभागाला मागील दीड महिन्यापासून खेटे मारत होते. यानंतर उर्वरित ५०० लाभार्थ्यांचा हप्ता ३१ मार्चपर्यंत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला होता. यातील ७०० च्या जवळपास लाभार्थी पहिल्या हप्त्यापासून वंचित राहिले आहेत. यामध्ये तालुक्यातील सर्वच गावांचा समावेश आहे. लाभार्थी पंचायत समितीमध्ये खेटे मारूनही हप्ता पडत नसल्यामुळे संतप्त झाले होते. मंगळवारी सकाळी घरकुलाच्या हप्त्यासाठी पंचायत समितीमध्ये लाभार्थ्यांनी गर्दी केली होती. अखेर पंचायत समिती विभागातील कर्मचारीची उत्तरे देत असल्याचे लक्षात आल्यानंतर लाभार्थ्यांनी संतप्त होऊन घरकुल विभागाच्या महिला लिपिक यू बी सय्यद व ऑपरेटर गोपाळ पाळवदे यास त्यांच्या दालनामध्ये कोंडून बाहेरून कुलूप लावण्यात आले. दुपारी दोन वाजता या विभागाला कुलूप लावण्यात आले होते. यावेळी गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे हे मात्र त्यांच्या दालनात होते. कुलूप लावून पाऊन तास झाले तरीही त्यांना मात्र कसल्याही प्रकारे खबर नव्हती.

या संदर्भात माहिती घेण्यासाठी पत्रकार गटविकास अधिकारी यांच्याकडे गेले असता मला या संदर्भात काहीच माहिती नसल्याचे सांगत उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यांनी नंतर बाहेर येत लाभार्थ्यांना समजावत कर्मचाऱ्यामार्फत कुलूप उघडण्यात आले. कोंडलेल्या दोन्ही कर्मचाऱ्यांना नंतर बाहेर काढण्यात आले. यामुळे पंचायत समितीमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते गटविकास अधिकारी श्री. लोखंडे यांचा वचक कर्मचाऱ्यावर नसल्यामुळे असे प्रकार घडत असल्याचे लाभार्थी बोलत होते. घरकुल विभागातील कर्मचारी चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ता टाकत नसल्याची तक्रार ही गटविकास अधिकारी यांना लाभार्थ्यांनी लेखी दिले आहे. यावेळी माझी उपसभापती प्रकाश कोकाटे, सामाजिक कार्यकर्ते समाधान चांदणे सह लाभार्थी उपस्थित होते. याविषयी गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे यांना विचारले असता संबंधित सांगत हात झटकले. गटविकास अधिकारी दालनातून बाहेर आल्यानंतर घरकुल विभागाला लावलेले कुलूप उघडून कर्मचाऱ्यांना बाहेर काढले.

#### तीन वेळा चकरा मारल्या

प्रधानमंत्री घरकुल योजनेत मला घरकुल मंजूर झाले आहे घरकुलाचा पहिला हप्ता मिळावा म्हणून पंचायत समिती येथील घरकुल विभागात तीन वेळा चकरा मारल्या हप्ता टाकण्यात येईल असे सांगण्यात येत होते तरीही मात्र खात्यावर पैसे जमा होत नाहीत.

– अरुण हरिभाऊ मुंडे, घरकुलधारक लाभार्थी जहागीरमोहा

#### आधार अपडेटचा प्रॉब्लेम

अनेक लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसल्यामुळे त्यांचे हप्ते त्यांच्या खात्यावर टाकण्याचा प्रयत्न करूनही बँकेत पैसे जमा होत नाहीत अनेक वेळा प्रयत्न केले होते त्यात आमचा काही दोष नाही.

– गोपाळ पाळवदे, ऑपरेटर

#### गटविकास अधिकारी यांचा वचक नाही

येथील पंचायत समिती कार्यालयामध्ये गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे रुजू झाल्यापासून त्यांचा सर्वच विभागावरील कर्मचाऱ्यावरील वचक कमी झाला आहे गटविकास अधिकारी कार्यालयात जरी नेहमी थांबत असले तरीही त्यांचे कोणीच कर्मचारी ऐकत नसल्यामुळे अनागोंदी कारभार वाढला आहे.

– समाधान चांदणे, सामाजिक कार्यकर्ते धारूर

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT